**ग्रामपंचायतींमार्फत आयोजित करावयाच्या ग्रामसभा व इतर विभागांनी त्यांचे विषय ग्रामसभेसमोर ठेवण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१७/प्र.क्र. ५१२/पंरा-३**

बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ
फोर्ट,मुंबई -४०० ००१
तारीख: २७ एप्रिल,२०१८

**प्रस्तावना -**

ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदीनुसार घ्यावयाच्या चार ग्रामसभांव्यतिरिक्त राज्य शासनाच्या इतर प्रशासकीय विभागांकडून राबविण्यात येणा-या महत्वाच्या योजना किंवा फ्लॅगशिप कार्यक्रमांच्या अनुषंगाने विशेष ग्रामसभा घेण्याबाबतचे निर्देश आयत्यावेळी किंवा अल्प कालावधीत जिल्हा परिषदांना देण्यात येतात. त्यामुळे अशा अचानक होणा-या ग्रामसभांमुळे वर्षभरातील ग्रामसभांची सरासरी संख्या वाढत आहे. परिणामी अशा सततच्या होणा-या सदर ग्रामसभांना ग्रामस्थांचा अल्प प्रतिसाद मिळतो व अशा ग्रामसभा आयोजित करण्याचे औचित्य साध्य होत नाही. तसेच आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेतील विषयसुचीवर सुयोग्य चर्चा न होता काही विपरित घटना घडत असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. राज्य शासनाचे विकासाचे धोरण विचारात घेता घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांच्या अनुषंगाने राबवावयाच्या योजनांची ग्रामसेवकांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदींनुसार पार पाडावयाची जबाबदारी विचारात घेता ग्रामसेवकांवरही ताण पडत आहे. या सर्व बाबी विचारात घेता विशेष ग्रामसभांचे नियोजन करण्यामध्ये कधी कधी काही त्रुटी राहिल्याने लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थांच्या रोषाला ग्रामसेवकांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, आयोजित करावयाच्या ग्रामसभांची संख्या मर्यादित ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यावर सर्वंकष विचारविनिमय करुन शासन पुढीलप्रमाणे सूचना देत आहे.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ७ मध्ये ग्रामसभेबाबत तरतूद करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम ७ मधील पोटकलम (१) मध्ये प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये ग्रामसभेच्या निदान चार बैठकी (सभा) घेण्यात येतील अशी तरतूद आहे. तसेच मुंबई ग्रामपंचायत (ग्रामसभेच्या बैठकी) नियम, १९५९ च्या नियम ३ (१) नुसार प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभा ही त्या वर्षाच्या सुरुवातीनंतर २ महिन्याच्या आत भरविण्यात आली पाहिजे आणि दुसरी सभा ही सरपंचाकडून किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंचाकडून ठरविण्यात येईल अशा तारखेस आणि वेळी प्रत्येक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात भरविण्यात आली पाहिजे. नियम ३(२) नुसार कलम ७ च्या उपबंधास अधिन राहून ग्रामसभेने ऑगस्ट महिन्यात एक व पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे २६ जानेवारी रोजी दुसरी अशा दोन जादा बैठकी घेतल्या पाहिजे.

२. सद्यस्थितीत सर्वसाधारणपणे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एका वित्तीय वर्षामध्ये राष्ट्रीय / राज्याच्या दृष्टीने महत्वाच्या अशा खालील दिनांकांचे औचित्य साधून ग्रामसभा आयोजित करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. दि.१ मे | - | महाराष्ट्र दिन |
| २. दि.१५ ऑगस्ट | - | स्वातंत्र्य दिन |
| ३.दि.२ ऑक्टोबर | - | महात्मा गांधी जयंती |
| ४. दि.२६ जानेवारी | - | प्रजासत्ताक दिन |

या व्यतिरिक्त ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या दृष्टीने नोव्हेंबर महिन्यामध्येसुध्दा ग्रामसभा आयोजित करण्यात येते. मात्र सध्या केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या महत्वाच्या योजना / फ्लॅगशिप कार्यक्रमांच्या अनुषंगाने अनेक विभागांकडून तातडीने विशेष ग्रामसभा घेण्याबाबतची विनंती करण्यात येते.

३. राष्ट्रीय व राज्याच्या महत्वाच्या तसेच फ्लॅगशिप योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरीता व ग्रामसभेच्या विषयसूचीतील विषयांवर सर्वंकष चर्चा घडवून आणण्याकरीता ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग व त्यांचा चांगला प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. याकरीता प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये ग्रामसभांचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात येईल:-

१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ७ नुसार नियमितपणे विहित कालावधीमध्ये चार ग्रामसभांचे आयोजन मे, ऑगस्ट, नोव्हेंबर या महिन्यांमध्ये व दि.२६ जानेवारी रोजी करण्यात येईल.

२) राज्य शासनाच्या ज्या विभागांना त्यांचे विषय ग्रामसभेसमोर ठेवावयाचे आहेत त्यांनी वरील महिन्यांमध्ये / दिनांक २६ जानेवारी रोजी होणा-या ग्रामसभेमध्ये विषय ठेवण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे व त्यानुसार त्यांचा विषय उक्त ग्रामसभांमध्ये ठेवण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविण्यात यावे.

३) उपरोक्त चार ग्रामसभांव्यतिरिक्त कोणत्याही विभागास विशेष ग्रामसभा आयोजित करावयाची असल्यास त्यांनी त्यांचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे पाठविण्यात यावा. ग्राम विकास विभागामार्फत अशा इतर विभागांच्या महत्वाचे व ग्रामपंचायतीशी निगडीत विषय विशेष ग्रामसभा घेऊन त्यावर विचारविनिमय करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत इतर विभागांनी परस्पर जिल्हा परिषदांना विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत निर्देश दिल्यास अशा ग्रामसभा जिल्हा परिषदांकडून आयोजित करण्यापूर्वी ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घ्यावेत.

४) दिनांक २६ जानेवारी वगळता इतर राष्ट्रीय वा राज्याच्या दृष्टीने महत्वाच्या दिनांकास नियमित ग्रामसभा आयोजित करण्यात येणार नाहीत. मात्र अशा दिनांकांना ध्वजवंदन, सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर कार्यक्रम / उपक्रम किंवा अशा महत्वाचे दिनांकाचे औचित्य साधून राज्य शासनास काही संदेश / प्रबोधन द्यावयाचे असल्यास अशा संदेशांचे वाचन व प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. असे संदेश ग्रामसभांमार्फत प्रसृत करावयाचे असल्यास इतर प्रशासकीय विभागांनी ते ग्राम विकास विभागाकडे पाठवावेत व ग्राम विकास विभागाकडून अशा सूचना जिल्हा परिषदांना देण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२७१२२३२५२६२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajashri Anil Tathare

Digitally signed by Rajashri Anil Tathare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f30e873703624252f67ca7850286dd7274902e1aceaf9810f98b22026249cc68, cn=Rajashri Anil Tathare
Date: 2018.04.27 16:01:46 +05'30'

**(रा.अ.ताठरे)**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव / सचिव
५. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
७. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
८. विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०.उपायुक्त , विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
११.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद (सर्व)
१२.निवडनस्ती (कार्यासन पंरा-३)